**<u>रे.मु.नं. ४३८/२०१० मधील निशाणी—४५ खालील आदेश</u>**

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जासोबत वादीने स्वत:चे शपथपत्र निशाणी—४६ लगत दाखल केलेले आहे.

२. वादीने त्याचे दावा दुरुस्तीचे अर्जात असे कथन केले आहे की, त्याने प्रस्तुतचा दावा, प्रतिवादींविरुध्द त्यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित मालकीच्या मिळकतींचे वाटप होऊन त्यामध्ये असलेला त्याचा अविभक्त हिस्सा प्रत्यक्ष कब्जात मिळणेसाठी तसेच जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी नं.३ ही वादीची चुलती आहे. परंतु दावा दाखल करतेवेळी मुद्रणदोषामुळे नजरचुकीने चुलती ऐवजी मुलगी असे लिहले गेलेले आहे. त्यामुळे तशी दुरुस्ती करुन मिळणेस परवानगी मिळणेची मागणी वादीने केलेली आहे.

३. वादीने त्याचे दावा दुरुस्तीचे अर्जात असे कथन केले आहे की, वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा डावलण्याच्या दृष्टीने प्रतिवादी नं.१ ने मिळकतीचे ७/१२ उतारा सदरी असलेल्या त्याच्या नावाचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीपैकी गट नं.३०४/१ मधील उत्तर बाजूचे क्षेत्र १ हे. ३४ आर हे दि. १०.०५.२०१० रोजी पोकळीस्त व बिनभरण्याच्या खरेदी खताने सौ. विद्या अविनाश गाडे यांना विक्री केलेले आहे. त्यानंतर सदर सौ.विद्या गाडे यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र दि.०५.१०.२०११ रोजी प्रतिवादी नं. १ चे सांगण्यावरुन श्री. शेख राजमहंमद रसूल यांना पोकळीस्त खरेदीखताने विक्री केलेले आहे. वादीचे कथन की, सदरची दोन्ही खरेदीखते ही बेकायदेशीर असून दावा मिळकतीतील त्याचे अविभक्त हिश्यावर बंधनकारक नाही. त्यामुळे त्याचे वाटपाचे दाव्यामध्ये दावा मिळकत खरेदी करणारे सौ. विद्या गाडे व श्री. शेख रसूल यांना प्रतिवादीपणात सामील करणे गरजेचे झाले आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही असे वादीचे म्हणणे आहे. यावरुन वादीने प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्ती त्याचे दाव्यामध्ये करण्यास परवानगी मागितली आहे.

४. प्रतिवादी नं. १ ते ९ यांचेतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. पी.एम.संसारे यांनी प्रस्तुतच्या अर्जावरच त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी सदरचा अर्ज खोटा व बनावट

आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस कुठलेही कारण घडलेले नसल्याचे त्यांनी कथन केलेले आहे. वादीने केवळ पुरावा निर्माण करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

५. वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे अनुक्रमे अर्जात व लेखी जबाबात केलेल्या विरुध्द कथनांवरुन, प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निकाली करणेसाठी खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्ती वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा खरा वाद गुणदोषावर निकाली करणेसाठी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे स्वरुपात बदल होईल काय ? | नकारार्थी. |
| ३. | प्रस्तुतचा अर्ज मुदतीत आहे काय ? | होकारार्थी. |
| ४. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. मी वादीचे वतीने त्यांचे विधिज्ञ श्री.आर के. सोनवणे व प्रतिवादी नं. १ ते ९ यांचे वतीने त्यांचे विधिज्ञ श्री. पी.एम. संसारे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं. १० ते १३ यांनी वादीचा दावा मान्य व कबूल केलेला आहे.

### <u>मुद्दा नं. १ बाबत :—</u>

७. वादीचा मुळ दावा हा दावा मिळकती, ज्या दाव्यातील पक्षकारांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित मालकीच्या मिळकती आहेत, त्यांचे सरसनिरस मानाने वाटप होऊन त्यात वादीचा असलेला अविभक्त हिस्सा प्रत्यक्ष कब्जात मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने त्याचे दावा दुरुस्तीचे अर्जात असे कथन केले आहे की, दावा दाखल करतेवेळी त्याचेकडून नजरचुकीने व मुद्रणदोषामुळे प्रतिवादी नं.३ जी नात्याने त्याची चुलती आहे तिचे नाते चुलती ऐवजी मुलगी असे नमूद झालेले आहे. वादीने

मागितलेली सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कुठलाही बदल होणार नाही. तसेच सदरची दुरुस्ती दाव्यामध्ये केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील मुळ वाद कायमस्वरुपी निकाली होण्यासाठी मदत होणार आहे व पुढील कायदेशीर प्रकरणांची गुंतागुंत टाळली जाणार आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी नं.३ चे नात्याबाबत मागितलेले दुरुस्ती मुळ दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे.

८. वादीने त्याच्या दावा दुरुस्तीचे अर्जात असे नमूद केले आहे की, प्रस्तुतचा दावा त्याने त्याच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित मालकीच्या मिळकतींचे वाटप होऊन त्यामध्ये असलेला त्याचा अविभक्त हिस्सा प्रत्यक्ष कब्जात मिळणेसाठी तसेच प्रतिवादीं विरुध्द जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा वाटपाचा दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकतीचे ७/१२ उतारा सदरी त्याचे असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीपेकी गट नं. ३०४/१ क्षेत्र १ हेक्टर ३४ आर हे दि. १०.५.२०१० रोजी बेकायदेशीर खरेदीखताने सौ विद्या अविनाश गाढे यांना विक्री केलेले आहे. तसेच पुढे दि. ५.१०.२०११ रोजी सौ. विद्या गाढे यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र त्यांनी प्रतिवादी नं.१ चे सांगण्यावरुन श्री.शेख राजमहंमद रसूल यांना बेकायदेशीररित्या विक्री केलेले आहे. वादीचे कथन की, सदरची दोन्ही खरेदीखते ही पोकळीस्त, बिनभरण्याची व बेकायदेशीर असून दावा मिळकतीतील त्याच्या अविभक्त हिश्यावर बंधनकारक नाही. प्रतिवादी नं.१ ने केवळ वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा डावलण्यासाठी व दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण करण्यासाठी, दावा मिळकत हस्तांतरीत केलेली आहे. त्यामुळे सदरचे क्षेत्र खरेदी घेणा—या इसमांना दाव्यात प्रतिवादीपणात समाविष्ट करुन त्यांचे विरुध्द जाहीर ठरावाची मागणी करणे वादीस क्रमाप्राप्त झालेले आहे.

९. याउलट प्रतिवादी नं. १ ते ९ यांनी प्रस्तुतचे दावा दुरुस्तीचे अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज खोटा व बनावट असलेचे नमूद केलेले आहे. या व्यतिरिक्त त्यांनी असे देखील नमूद केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास वादीस काहीएक कारण घडलेले नाही. परंतु वादीने त्याचे दावा दुरुस्तीचे अर्जात दावा मिळकतीच्या हस्तांतरणाबाबत केलेल्या कथनांसदर्भात प्रतिवादी नं.१ ते ९ यांनी काही एक नमूद केलेले नाही. याउलट वादीने त्याचे अर्जातील कथनांचे पृष्टयार्थ सदर

खरेदीखतांवरुन मंजूर झालेल्या फेरफार (६ड) च्या नोंदीचे उतारे दाखल केलेले आहे. त्यावरुन असे स्पष्ट होते की, दावा मिळकतीपैकी गट नं. ३०४/१ या मिळकतीची विक्री प्रतिवादी नं.१ ने सौ. विद्या गाडे यांना केलेली आहे व पुढे सौ. विद्या गाडे यांनी सदरची मिळकत श्री. शेख रसूल यांना विक्री केलेली आहे. वादीचा मुळ दावा हा वाटपासाठी व कब्जासाठी दाखल केलेला होता. प्रस्तुतचा दावा न्यायालयात प्रलंबीत असताना प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र विक्री केलेले आहे. सदरच्या मिळकतीमध्ये वादी हा वाटप होऊन त्याचा हिस्सा मागत आहे. प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकती संदर्भात केलेले हस्तांतरण हे दावा दाखल केल्यानंतरची घटना आहे त्यामुळे त्याबाबत दाव्यात दुरुस्ती करुन नमूद करणे व दावा मिळकती खरेदी घेणा—या इसमांना प्रतिवादीपणात समाविष्ट करणे वादीस जरुरीचे झालेले आहे. जर प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर निश्चितच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा मुख्य वाद निर्णयीत निघणार नाही व भविष्यात न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत निर्माण होईल. म्हणून वरील सर्व चर्चेच्या अनुषंगाने असे स्पष्ट होते की, वादीने त्याचे दावा दुरुस्तीचे अर्जात नमूद केलेली दुरुस्ती, ही वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा मुळ वाद कायम स्वरुपी गुणदोषावर निकाली करणेसाठी आवश्यक आहे. यावरुन मी मुद्दा नं. १ चा निष्कर्ष “होकारार्थी” नोंदवित आहे.

**<u>मुद्दा नं.२ बाबत :—</u>**

१०. वादीचा मुळ दावा हा दावा मिळकतींच्या सरसनिरस वाटपासाठी व त्यातील वादीचा असलेला अविभक्त हिस्सा प्रत्यक्ष कब्जात मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्ती ही सदरचा दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकती संदर्भात केलेल्या हस्तांतरणामुळे उपस्थित झालेली आहे. वादीने सदरचे हस्तांतरण हे दावा मिळकतीतील त्याचे हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहीर करुन मिळणेची मागणी केलेली आहे. सदरची मागणी वादीचे मूळ दाव्यात नमूद केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कुठलाही बदल होणार नाही. वादीचा मुळ दावा वाटप व कब्जासाठी तसेच जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी असल्याने त्यामध्ये आणखी एका जाहीर ठरावाच्या मागणीचा समावेश झाल्यास, वादीच्या मुळ दाव्याच्या स्वरुपामध्ये कुठलाही बदल होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा नं.२ चा निष्कर्ष “नकारार्थी” नोंदवित आहे.

**<u>मुद्दा नं. ३ बाबत :—</u>**

११. वादीने प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज हा दाव्याचे चौकशीचे कामकाज सुरु होण्यापूर्वी तसेच मुद्दे निश्चित होण्यापूर्वी दाखल केलेला असल्याने, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज हा कायदेशीर मुदतीत दाखल केलेला आहे असे स्पष्ट होत आहे. यावरुन मी मुद्दा नं.३ चा निष्कर्ष "होकारार्थी" नोंदवित आहे.

१२. वादीच्या प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाचे बारकाईने अवलोकन करता असे निदर्शनास येते की, वादीने त्याचे मुळ दाव्याचे आकारणीमध्ये दुरुस्तीची मागणी केलेली नाही. वास्तविक वादीने प्रस्तुतच्या दावा दुरुस्तीचे अर्जात केलेली जाहीर ठरावाची मागणी ही त्याचे मुळ दाव्यात समाविष्ट नव्हती. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जातील जाहीर ठरावाची मागणी मुळ दाव्यामध्ये समाविष्ट केल्यानंतर दाव्याच्या आकारणीमध्ये देखील निश्चितच बदल होणार आहे. त्यामुळे वादीने त्याचे प्रस्तुतच्या अर्जात केलेल्या जाहीर ठरावाच्या मागणीची योग्य ती आकारणी करुन, त्याबाबत त्याचे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्यावर नियमाप्रमाणे आवश्यक असणारा कोर्ट फी स्टॅम्प लावून देणे वादीस क्रमप्राप्त आहे.

१३. वरील सर्व चर्चेच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा निशाणी—४५ लगतचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्ती या आदेशापासून १४ दिवसांचे आंत दाव्यात करावी व दाव्याची दुरुस्त प्रत दाव्यासोबत कायदेशीर मुदतीत दाखल करावी.

३. वादीने प्रस्तुतच्या अर्जातील नमूद जाहीर ठरावाच्या मागणीची योग्य ती आकारणी करुन, त्याबाबतची दुरुस्ती मुळ दाव्यात करुन नियमाप्रमाणे त्यावर आवश्यक असणारा कोर्ट फी स्टॅम्प दाव्यासोबत लावून दयावा.

दि. ०६.१०.२०१२

**(तुषार बा.वाजे)**
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर
राहुरी.